# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

***( परीक्षा विभाग )***


एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३५२


जा. क्रं./गों.वि./परीक्षा विभाग/१४०१/२०१५ दि.०३/०८/२०१५

## परिपत्रक

(नामांकन सत्र २०१५–१६)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **शैक्षणिक सत्र २०१५–१६** च्या प्रवेश प्रक्रीयेची कार्यवाही सुरू आहे. महाविद्यालयांना नामांकनाच्या Online प्रक्रीया संदर्भात खालील प्रमाणे महत्वपुर्ण सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

१) महाविद्यालयामध्ये **दि. ०६/०८/२०१५** पर्यंत Online झालेले सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाला Online Submit to Registration (Data Upload) करून विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

२) **दि. ०६/०८/२०१५** पर्यंत झालेल्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे नामांकन हे कोणत्याही परीस्थितीत **दि. २२/०८/२०१५** पर्यंत विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे. आणि नामांकन आवेदन पत्राची संबंधीत लिपीकाकडुन पोच घेणे आवश्यक आहे.

३) वित्त विभागाव्दारे जाहीर केलेल्या सुधारीत परिपत्रक **गों.वि.ग. /विलेवि/१२८९/२०१५, दि. २९/०७/२०१५, नुसार प्रति विद्यार्थी रू. १२५/– प्रमाणे** नामांकन शुल्क घेण्यात येत आहे. करीता नामांकन शुल्काचे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचे धनाकर्ष (D.D.) हा **"वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली"** payable at गडचिरोली यांचे नावाने असावा. तसेच धनाकर्ष हा **दि. २२/०८/२०१५** पर्यंतचा असावा. तसेच महाविद्यालयाने नामांकन अर्ज जमा करण्यासाठी अतिरिक्त दोन दिवसांचा कालावधी (दिनांक २४,२५ ऑगस्ट २०१५) पर्यंत राहील. यानंतर आलेल्या नामांकनासाठी नियमानुसार विलंबशुल्क आकारण्यात येईल.

४) विद्यापीठात नामांकन आवेदनपत्र सादर करतेवेळी महाविद्यालयाने खालीलप्रमाणे महत्वाची कागदपत्रे सोबत जोडणे अनिवार्य आहे.

**१. नियमित /कार्यकारी प्राचार्य मान्यता पत्र.**
**२. संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना स्वाक्षरी प्रदान केलेले असल्याचे पत्र/स्वाक्षरी नमुना.**
**३. वित्त विभागाचे ना देय प्रमाणपत्र.**
**४. विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण पत्र.**
**५. ज्या शैक्षणिक वर्षाचे फॉर्म स्विकाराचे आहे त्या वर्षाचे संलग्निकरण प्रमाणपत्र.**
**६. अभ्यासक्रमाला शासनाने दिलेली मान्यता पत्र.**
**७. महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे प्रमाणपत्र.**
**ज्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेंश घेतलेले आहेत त्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेश क्षमतेचे मंजुरीपत्र सादर करणे आवश्यक आहे.**
**८. नामांकन आवेदन पत्रासोबत विद्यार्थ्यांचे Eligiblity Status Report जोडणे आवश्यक आहे.**

५) महाविद्यालयाने नामांकन करीत असतांना सदर माहीती Form A,B & Form E,F मध्ये सादर करावे. ही सर्व प्रपत्र www.gondwana. digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सोबत Soft Copy (CD) देण्यात यावी.

६) विद्यार्थ्यांचे नामांकन हे नियोजित वेळेतच झाले पाहीजे. ज्या विद्यार्थ्यांचे नामांकन होणार नाही त्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदन पत्र संकेतस्थळावर उपलब्ध होणार नाही.

७) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतांना त्या विद्यार्थ्यांची सदर अभ्यासक्रमासाठी असलेली आवश्यक शैक्षणिक पात्रता तपासुनच विद्यापीठाच्या निर्देशानुसारच प्रवेश द्यावा. अपात्र असलेल्या विद्यार्थ्यांला प्रवेश दिल्यास विद्यापीठाव्दारे कधीही त्यांचे नामांकन रद्द् केले जाईल व याची सर्वस्वी जबाबदारी ही त्या संबंधीत महाविद्यालयाची राहील.

८) ज्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द (Admission Cancel ) करावयाचे असेल त्यांनी आपल्या महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह त्या विद्यार्थ्यांचे नाव, अभ्यासक्रम, सेमीस्टर व Online eligibility Form No. लिहुन विद्यापीठात सादर करून तात्काळ प्रवेश रद्द करावे.

९) बाहेरील विद्यापीठाच्या/बोर्डच्या विद्यार्थ्याचे नामांकन करतेवेळी सदर विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्र घेऊनच प्रवेश निश्चित करावा. तसेच **गों.वि./जा.क्र./प.पु.वि./प्र.शु./३५०/२०१४, दि. २४/०२/२०१४ नुसार** कार्यवाही घेऊन Immigration (प्रवजन) शुल्क व्यावसायीक अभ्यासक्रमाकरीता रू. २००/— व अव्यवसायीक अभ्यासक्रमाकरीता रू. १००/— भरणे आवश्यक राहील.

१०) नामांकन आवेदनपत्र व संलग्नित कागदपत्रे हे बॉक्स फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे. आणि मुळ गुणपत्रिका व ईतर प्रमाणपत्र वेगळया फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे.

११) ज्या महाविद्यालयात विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य तथा प्राध्यापक यांची पदे ( महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या सर्व विषय व अभ्यासक्रमाकरीता ) भरलेली नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नामांकन आवश्यक विहीत नमुन्यात हमीपत्र रू. १००/— स्टॅम्प पेपर वर सादर करणे आवश्यक आहे.

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली

प्रतिलिपी :— १) मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा.कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
३) स.कु.स., विद्या विभाग, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
५) मा.संचालक,महाविद्यालयीन विभाग,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

सहा.कुलसचिव(परीक्षा पुर्व)
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली